# 'द न्यूज बिज टाईम्स'

दि. ५/९/२०२६ पिंपरी, महाराष्ट्र, thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृत्ती


# रक्षा कर्मचाऱ्यांसाठी 'सायबर सुरक्षा प्रभाव उपक्रम'; प्रत्यक्ष अनुभवातून सायबर सुरक्षेचा जागर

## डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये Cyber Warriors चा प्रभावी उपक्रम



**पिंपरी, प्रतिनिधी :**

डिजिटल युगात वाढत्या सायबर धोक्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सुरक्षित डिजिटल सवयी रुजविण्याच्या उद्देशाने डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरीच्या क्विक हिल फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लब तर्फे विविध सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. माय डाटा माय रिस्पॉन्सिबिलिटी या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या यंदाच्या थिंक बिफोर यु क्लिक या थीमअंतर्गत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी सायबर सुरक्षा प्रभाव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात सायबर वॉरियर्स सार्थक आणि कैवल्य यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांशी संवाद साधत केवायसी आणि ओटीपी फसवणूक, डिजिटल अरेस्ट, मनी म्युल , सोशल मीडिया हाताळणी आणि सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या सायबर फसवणुकींची उदाहरणे देत संशयास्पद कॉल, लिंक किंवा संदेशांपासून सावध राहण्याचे तसेच वैयक्तिक व आर्थिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न व शंका मांडल्या आणि सायबर वॉरियर्सनी त्यांचे निरसन केले.

दरम्यान, डिजिटल अरेस्ट फसवणुकीचा प्रत्यक्ष बळी ठरलेल्या एका व्यक्तीशी संवाद साधण्याची संधी मिळाली. संबंधित व्यक्तीची सुमारे ८० हजारांची फसवणूक झाल्याचे समोर आले. या प्रत्यक्ष अनुभवामुळे डिजिटल अरेस्ट सारख्या सायबर गुन्ह्यांमध्ये वापरला जाणारा मानसिक दबाव आणि फसवणुकीची पद्धत सहभागींसमोर अधिक प्रभावीपणे स्पष्ट झाली. उपक्रमादरम्यान निखिल अँटिफॉड पचे सक्रियकरण करून प्रतिबंधात्मक डिजिटल सुरक्षेच्या उपाययोजनांची प्रत्यक्ष माहितीही देण्यात आली. त्यामुळे हा उपक्रम केवळ माहितीपर न राहता प्रत्यक्ष कृतीशी जोडला गेला.

या उपक्रमाला सुरक्षा व दक्षता विभागाचे संचालक खान सर यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामाच्या अनुषंगाने सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी उपक्रमाचे कौतुक केले. कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग, प्रश्नोत्तरांचा संवाद आणि प्रत्यक्ष अनुभवांची देवाणघेवाण यामुळे सत्र अत्यंत संवादात्मक आणि प्रभावी ठरल्याचे त्यांनी नमूद

सायबर जनजागृती प्रभाव उपक्रमादरम्यान ॲड. संकेत कर्डिले हे हितधारक म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपक्रमाचे कौतुक करताना, आजच्या डिजिटल युगात सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांची अत्यंत गरज आहे. नागरिकांनी कोणतीही लिंक, ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती शेअर करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घेतली पाहिजे, असा अभिप्राय दिला.

क्विक हील फौंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा कटकर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजित पाटील आणि क्लबचे समन्वयक प्रा. सत्यवान कुंजिर यांचे मार्गदर्शन, सहकार्य व प्रोत्साहन लाभत आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून सायबर वॉरियर्स कडून समाजातील विविध घटकांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.